# वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८७ /२०२५ दि. २३/०८/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, वागळे** वाहतूक उप विभागाचे हद्दीत **दिनांक २७/०८/२०२५ ते दिनांक ०६/०९/२०२५** या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. सदर कालावधीत पायलादेवी मंदिर, उपवन तलाव, वर्तकनगर, ठाणे येथे विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१)** वर्तकनगर – शास्त्रीनगर – देवदयानगर – गांधीनगर – कापूरबावडी कडून तसेच पवारनगर कडून उपवन तलाव कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (गणपती मूर्ती असलेली वाहने वगळून) **बिरसा मुंडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** वर्तकनगर – शास्त्रीनगर – देवदयानगर – गांधीनगर – कापूरबावडी कडून तसेच पवारनगर कडून उपवन तलाव कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने बिरसा मुंडा चौक येथून उजवीकडे वळून पवारनगर कडे जाणाऱ्या रोडने द क्रेव ट्रक रेस्टॉरंट बाजूचे **Assen Pvt. Ltd.** गेट नं. १८ येथून डावीकडे वळून सरळ पुढे गावंडबाग मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब)** गांधीनगर – कापूरबावडी व पवारनगर कडून उपवन तलाव मार्गे येऊर कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने बिरसा मुंडा चौक येथून डावीकडे वळून सरळ देवदयानगर चौक कडून उजवीकडे वळून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **२)** गावंडबाग परिसरातील सर्व सोसायटी व कोकणीपाडा नं. १, उपवन येथील सर्व प्रकारच्या वाहनांना **लोटस् सोसायटी मेन गेट समोरील गावंडबाग येथील सार्वजनिक शौचालय ठामपा.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** गावंडबाग परिसरातील सर्व सोसायटी व कोकणीपाडा नं. १ येथील सर्व प्रकारची वाहने निलगिरी सोसायटी कॉर्नर आशापुरा – नवजीवन मेडिकल येथून डावीकडे वळून गावंडबाग बंगला – सुर्या सोसायटी – गुलमोहर सोसायटी – द क्रेव ट्रक रेस्टॉरंट बाजूचे **Assen Pvt. Ltd.** गेट नं. १८ कडून पवारनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग –** **अ) पायलादेवी मंदिर ते बिरसा मुंडा चौक दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस वाहने पार्क करण्यास मनाई आहे.**
**ब) पायलादेवी मंदिर ते ॲम्पी थिएटर दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस वाहने पार्क करण्यास मनाई आहे.**
**क) बिरसा मुंडा चौक ते रवि इस्टेट सोसायटी (देवदयानगर) मंत्रांजली बंगला दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस वाहने पार्क करण्यास मनाई आहे.**

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दिनांक २८/०८/२०२५ रोजी ( दीड दिवस ), दिनांक ३१/०८/२०२५ ( पाच दिवस), दिनांक ०२/०९/२०२५ ( गौरी गणपती विसर्जन दिवस ), दिनांक ०६/०९/२०२५ ( अनंत चर्तुदशी )** या कालावधीत **दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई विरार महानगरपालिका
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/वागळे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.